**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.**

मंगळवार, दि. 22.05.2017 रोजी सकाळी 11.00 वाजता नांवामनपा स्थायी समितीची सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थायी समितीचे सदस्य उपस्थित होते.

**सौ. देशमुख मंगला गजानन, सभापती**

**सर्वश्री**

| | |
|---|---|
| तेहरा अनुजा अमितसिंह | फारुख हुसेन कासीम साब |
| कोकुलवार लक्ष्मीबाई तुळशीराम | कदम गंगाबाई नारायण |
| चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह | मोकले सोनाबाई रामचंद्र |
| स. जानी म. कासीम | कल्याणकर बालाजी दत्तराव |
| गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल | जाधव जयश्री आनंद |
| अंजुम बेगम शेख अफरोज | |

**सभापती** उपस्थित सर्व स्थायी समितीचे स. सदस्य, प्राधिकारी अधिकारी तथा उपआयुक्त (विकास) श्री रत्नाकर वाघमारे, प्राधिकृत अधिकारी तथा उपआयुक्त (महसुल) तथा मुख्यलेखाधिकारी श्री कंदेवार, मुख्य लेखा परिक्षक श्री आर.एस.कोलगणे, कार्यकारी अभियंता श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता श्री सुग्रीव अंधारे, सर्व विभाग प्रमुख, क्षेत्रिय अधिकारी यांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**उमेश चव्हाण** आज स्थायी समिती बैठक आहे पण या बैठकीला विभाग प्रमुखांची का आले नाही बरेच विभाग प्रमुख उपस्थित नाहीत. या विषय पत्रिकेत अत्यंत जे विषय आहेत त्या विभागाचे विभाग प्रमुख नाहीत. त्यामुळे सभागृहास माहिती मिळणे अशक्य होणार नाही. निविदेबाबतचा नविन जीआर आलेला आहे. सदर जीआर येवून बरेच दिवस झाले तरी त्याची माहिती आम्हाला का देण्यात आली नाही. यासाठी या जीआरचा अभ्यास करण्यासाठी आम्हाला वेळ देण्यात यावा. तसेच आज आयोजीत केलेली सभा अधिकारी वर्ग उपस्थित नसल्याने दोन दिवस पुढे ढकलण्यात यावी. कारण यात कार्योतर मान्यताचा प्रस्ताव आहे.

**सभापती** अधिकारी वर्गाने कोणाची परवानगी घेवून ते अनुपस्थित राहीले याचा खुलासा करावा.

**नगरसचिव** कार्यकारी अभियंता सांबावि हे मा. पालकमंत्री महोदयांनी आज रोजी मुंबई येथे अचानक बैठक आयोजित केली असल्याने त्या बैठकीस उपस्थित राहणे साठी मुंबई येथे गेले आहेत.

**सभापती** ज्या दिवशी स्थायी समिती बैठक असते त्या बैठकीस सर्व विभाग प्रमुखांनी उपस्थित रहाणे अनिवार्य आहे. बैठकीस उपस्थित राहणे शक्य नसल्यास परवानगी माझी परवानगी देण्यात यावी.

**प्राधिकृत अधिकारी** सांबाविभागाचे कार्यकारी अभियंता हे मुंबई येथे बैठकीस गेलेले आहेत परंतू सभागृहास माहीती देण्यासाठी उप अभियंता हे उपस्थित आहेत. त्यांच्यामार्फत सभागृहास माहिती सादर करता येईल. कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व मलनिस्सारण, हे सभागृहात उपस्थित आहेत.

**तुलजेश यादव** या सभेमध्ये बरेच विषय वादग्रस्त आहेत. त्यासाठी त्या विषयाची माहिती करुन घेणे व त्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. याकरीता आम्हाला दोन ते तीन दिवसाचा वेळ देण्यात यावा. त्यामुळे सभा ही दोन ते तीन दिवसानंतर घेण्यात यावी अशी मी सभापती महोदयांना विनंती करतो.

**स.जानी अ.कासीम** आजच्या विषय पत्रिकेवर बरेच विषय आहेत. विषय हे क्लीस्ट आहेत त्यामुळे त्या विषयाचा अभ्यास करण्यासाठी वेळ देणे गरजेचे आहे. तसेच या सभागृहात अधिकारी नसल्यामुळे आम्ही जे प्रश्न विचारु त्या प्रश्नाची उत्तरे देण्यासाठी त्या विभागाचा अधिकारी नाहीत त्यासाठी सभा ही पुढे ढकलण्यात यावी.

**बाळासाहेब देशमुख** आम्ही शहराच्या हितासाठी निर्णय घेतले पाहीजे. यात काही असे विषय आहेत त्या विषयाबाबत काही वाद होण्याची शक्यता आहे. त्या विषयावर आम्ही निर्णय घेतला तर अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. चार ते पाच कोटीचे कामे केलेले आहेत. पण हे कामे केले किंवा नाही याची आम्हाला माहिती नाही कामे झाले नसतील आणि त्यावर निर्णय घेतल्यास अडचण येईल. आणि त्या विभागाचा कार्यकारी अभियंता देखील गैरहजर आहेत. झालेल्या कामावर अभ्यास करुन निर्णय घेतलेला बरे राहील असे मला वाटते. या कामाची काही चौकशी होवू नये

किंवा चौकशी लागु नये.यामुळे आपल्यावर कोणताही ठपका लागु नये असे मला वाटते. दिनांक 26 मे 2017 रोजी सर्व साधारण सभेची मिटींग आयोजित करण्यात आलेली आहेत. त्या मिटींग नंतर स्थायी समितीची बैठक आयोजित करण्यात यावी. या बैठकीत अधिकारी वर्ग देखील उपस्थित नाहीत. त्यामुळे या बैठकीस योग्य माहिती मिळेल याची शंका आहे. आजची मिटींग ही पुढे ढकलण्यात यावी.

**उमेश चव्हाण** सभापती महोदया, या विषयपत्रीकेवरील विषय क्र 18 हा महत्वाचा विषय आहे. त्यामध्ये त्यांनी 17.51 टक्के बिलो भरलेले आहे. त्यांनी बिलो भरले असल्याने ते काम करतील किंवा मध्येच सोडून जातील असे मला वाटते. एवढे कंत्राटदाराने बिलो का टाकले यात शंका येते. का तो काम सोडून जाईल का असे मला वाटते. या संदर्भात पुढील मिटींग मध्ये सविस्तर माहिती सभागृहाला सादर करावी. केंद्र शासनाने एक एजन्सी फिक्स केलेली आहे ती एजन्सी एमजीपी ही एजन्सी निश्चीत केली आहे. या एजन्सीच्या कोणत्या ठिकाणी काम केले आहे याची माहिती घेण्यात यावी तसेच एमजीपीने हा सविस्तर अहवाल तयार केलेला आहे त्यांचेही माहिती घेण्यात यावी. काम देण्यापुर्वी पुर्ण चौकशी करण्याचा अधिकार आपणास आहे. कंपनीने काम केले नाही तर त्याचा ठपका आपल्यावर येणार आहे.

**प्राधिकृत अधिकारी** इतर शहरातही 15 टक्के बिलोचे टेन्डर आलेले आहेत. त्यामुळे आपल्याकडे 17.79 टक्के बिलो आलेले आहे. काही ठिकाणी 10 ते 12 टक्के बिलो आलेले आहे. एन्डीशनल डिपोजीट त्या संबंधीत एजन्सी कडून आपण भरणा करुन घेणार आहोत. श्री उमेश चव्हाण : दोन दिवसात पुर्ण सविस्तर माहिती सभागृहा समोर सादर करावी त्या दोन दिवसानंतर बैठक आयोजित करुन हा विषय पास करुन देण्यात येईल परंतू प्रथम माहिती सादर करावी. बिलो आल्यामुळे मनपाचा फायदा होणार आहे. याची आम्हाला जानिव आहे. परंतू काम मध्येच सोडून जावू नये ही भिती देखील आहे.काम सोडून गेले शहराचा लॉस होणार आहे. त्यामुळे सविस्तर माहिती दोन दिवसात प्रशासनाने सादर करावी त्यासाठी दोन दिवसा करीता सभा तहकुब करावी अशी विनंती मी सभापती महोदयाना करतो.

**सभापती** आजची सभा ही तहकुब करण्यात येते व सभेचे पुढील तारीख नंतर जाहिर करण्यात येईल. पुढील बैठकीत सर्व अधिकारी वर्ग उपस्थित राहील याची काळजी नगरसचिव यांनी घ्यावी. सभा तहकुब करण्यात येते.

**उमेश चव्हाण** कांही विभाग प्रमुख नसल्याने विषयावर चर्चा करता येत नसल्यामुळे आजची सभा तहकुब करण्यात यावी असा माझा प्रस्ताव आहे

**कल्याणकर बालाजी** श्री उमेश चव्हाण यांनी विभाग प्रमुख नसल्यामुळे आजची सभा तहकुब करण्याचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहेत.

**सभापती** श्री उमेश चव्हाण यांनी मांडलेला प्रस्तावानुसार आजची सभा सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे सदरील सभेची तारीख नंतर लेखी कळविण्यात येईल.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव,** | **सभापती,** |
| नांवाशमनपा, नांदेड. | **स्थायी समिती,** |